NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL
NAAC
EXCELLENCE • CREDIBILITY • RELEVANCE

सत्यमेव जयते
Government of Maharashtra

GOVT. COLLEGE OF ARTS & SCIENCE AURANGABAD

# Fostering Teaching Learning Practices for Quality Enhancement in Higher Educational Institutions

Editor : Dr. Rajendra H. Satpute

Book Title

- **Fostering Teaching Learning Practices for Quality Enhancement in Higher Educational Institutions**

Editor's Name

- **Dr. Rajendra H. Satpute,**
Principal (I/c),
Government college of Arts & Science,
Aurangabad (Maharashtra)
Phone : **(0240) 2341476**

- Edition Details : **I, 5th July 2021**

- ISBN - 978-81-952413-1-6

Publishing Agency

- **Aatmabhan Prakashan, Aurangabad**

Publisher's Address

- **Dr. Sanjeevkumar Sawale,**
A25, Infront Of Premchand Mugdiya D. Ed. College,
Pahadsing Pura, Hanuman Tekdi,
Aurangabad. 431004 (Maharashtra)
Mobile : **9404010804**

Printer's Details

- **Rudrayani Printer's,**
Town Center, Aurangabad,

- Price : **Rs. 500**

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

- Copyright : © **Aatmabhan Prakashan, Aurangabad**

# भारतीय शिक्षणातील अध्ययन आणि संशोधनाचे काळानुरूप परीवर्तन




**डॉ. सुरेंद्र ठाकुर**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*समाजशास्त्र विभाग,*
शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.
surrendrathakur@gmail.com
मो. 9860558919


**प्रस्तावना :**

भारतीय शिक्षण पद्धतीवर विचारविमर्श करावयाचा म्हटल्यास मुख्यत्वेकरून अध्ययन, अध्यापन, अध्यापन विषय, अध्यापनाचा उद्देश व अध्यापनाचे मूलाधार असणारे शिक्षक व विद्यार्थी यांचे नातेसंबंध आणि कालानुरूप झालेला बदल इत्यादींचा बोध होणे क्रमप्राप्त ठरते.

मानव हा समाजशील प्राणी असल्याने तो जन्मापासून ते मरेपर्यंत स्वतःच्या यथोचित विकासासाठी प्रयत्नशील असतो. ह्या प्रयत्नात त्याच्या मदतीला त्याचे आई-वडील, भाऊ-बहिण, आप्तसंबंधी नातलग, शेजारी व मित्र परीवार हे असतात. पण याहीपूर्वीचा संदर्भ लक्षात घेतल्यास असे लक्षात येते की, अगदी रानटी अवस्थेत, निसर्गाकडे पाहून, निसर्गाच्या बारीक-सारिक सूक्ष्म अशा निरीक्षणावरून, निसर्गाचे अनुकरण करून आणि प्रसंगी निसर्गालाच 'गुरु' मानून जीवनपयोगी ज्ञान परंपरा असल्याची आढळते. मानव निसर्गातील नद्या, नाले, पर्वत, वृक्ष व वेली या सर्वांकडून जीवनपयोगी असे ज्ञान ग्रहण करीत आलेला आहे. जसे की, जंगलात लागलेला वणवा पाहून आगीचा शोध लागला, पर्वतातील गुंफा पाहून घर बनविण्याचे कौशल्य विकसित होण्यास सुरुवात झाली; आणि स्वच्छंदी विहार करणाऱ्या पक्षांना पाहून विमानाचा शोध लागला वगैरे. सांगायचे तात्पर्य हेच की, प्राचीन आदिम मानवाने निसर्गाच्या सान्निध्यात राहत असताना केलेल्या निरीक्षण व आलेल्या अनुभवाच्या बळावर, काही वेळा कुटुंबियांकडून तर कधी समाजातील ज्येष्ठ व अनुभवी व्यक्तीकडून प्राप्त ज्ञान व माहितीच्या आधारे जीवननिर्वाह करण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे आढळते.

जीवन संघर्षाच्या ह्या वाढत्या आकांक्षेपोटीच ज्ञानाचे अनन्यसाधारण महत्त्व वाढायला लागले. त्याचे फलित म्हणून मग शिक्षणाचे हे दालन 'ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे' हे वेदकालिन युगातील एक आदर्श म्हणून पुढे आले. हळूवारपणे शिक्षणाची ही धूरा सांभाळणारे शिक्षक आणि ज्ञान घेणारे विद्यार्थी असे दोन्ही घटकही शिक्षणव्यवस्थेचा मूलाधार बनून पुढे आले. शिक्षक आणि विद्यार्थी अगर आचार्य आणि शिष्य हे दोन्ही घटक एकमेकांच्या आयुष्यात येवून स्वतःच्या आयुष्याला खरा अर्थ देत असताना समाजजीवनाचे आरोग्य, स्थैर्यता व शांतता निकोप राहण्यासाठीची बांधिलकी याचे व्रत मनापासून दोघेही पालन करू लागले.

हे सर्व करीत असताना काळानुरूप ज्ञानाच्या पद्धती, तंत्रे, साधने, उद्दिष्ट्ये,




PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

अध्यापन पद्धती आणि अभ्यासाची कार्यक्षेत्रे निश्चितच बदलत गेल्याचे सर्वश्रूत आहे. ज्ञानार्जनासारख्या गरजेपोटी सर्वच काळात एकत्रित आलेले हे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात एक स्नेहभाव नातेसंबंध निर्माण होवून दोघेही स्वत:ची बांधीलकी व जबाबदारी म्हणून समाजसंघटन व राष्ट्रहित जोपासण्याचा प्रयत्न करताना आढळताहेत; पण कालानुरुप यामध्ये वैविध्य मात्र निश्चितच पहावयास मिळते आहे.

संबंधित संशोधनपूर्ण लेखात वेदकालिन अध्ययन व संशोधन कालानुरुप कसे बदलत गेले याबाबतची समिक्षा करण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षण क्षेत्रातील अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि अध्यापनाचे शास्त्र हे सर्वच घटक परस्परावलंबी, परस्परसंबंधीत व परस्परपूरक असल्याचे हजारो वर्षापासून ते आजतागत पहावयास मिळते आहे. पण कालानुरुप ते संरचनात्मक व प्रकार्यात्मक अशा दोन्ही अंगानी बदलल्याचे ठळकपणे लक्षात येत आहे. ह्या परीवर्तनासाठी अध्ययन करणारा व अध्यापन करणारा असा अनुक्रमे विद्यार्थी व शिक्षक जसा कारणीभूत आहे; तसे समाजजीवनातील बदलती आव्हाने आणि मानवप्राण्यांच्या बदलत्या गरजा, जीवनशैली, वैचारीकता व विचारप्रणाली काहीअंशी जबाबदार असल्याचे वाटते. परीणामी भारतीय शिक्षणाचे परीवर्तन समजावून घेण्यासाठी शिक्षण म्हणजे काय? शिक्षणाचे स्वरूप व अभ्यासविषय कोणता? शिक्षणाचा मुख्य उद्देश काय? शिक्षण आणि संशोधन यांचा सहसंबंध कसा बदलत जातो आहे? शिक्षण क्षेत्रातील बदलते शिक्षक व विद्यार्थी यांचे नातेसंबंध वगैरे सारख्या बाबींचा आढावा घेणे अत्यावश्यक वाटते.

भारतीय ज्ञानाचे उगमस्थान या दृष्टीने वेदांना अत्यंत अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन समाज, धर्म व संस्कृतीचे दर्शन वेदांमध्ये असल्याने वेदांची उत्कटता, भव्यता, दिव्यता, गूढता, वैभव आणि मानवाचे भौतिक, पारमार्थिक व आध्यात्मिक सामर्थ्य वेदांमध्ये स्पष्टपणे जाणवते. म्हणूनच भारतीय शिक्षणाचा परीचय करून घ्यावयाचा असल्यास आपणास वेदांचा आधार घेणे अत्यावश्यक व क्रमप्राप्त ठरते. वास्तविकत: वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा होतो. वेद हे आद्यज्ञान, उत्तम काव्य, विद्या व कला यांचे उगमस्थान व स्फूर्तीस्थान आहे.

वेदकालिन शिक्षण म्हणजे विद्या, ज्ञान, बोध व विनय यांचा एकत्रित संयोग होय. प्रारंभी वेद वाङ्मय हे अक्षरश: वाक्मय असून ते गुरुमुखातून प्राप्त होत असायचे. म्हणूनच वेदकालिन शिक्षणचा अर्थ पाहताना व्यापक व सीमित अशा दोन्हीही अंगानी पहाणे गरजेचे ठरते. व्यापक अर्थाने शिक्षण म्हणजे व्यक्तीला सभ्य व सुंस्कारीत करून आत्मोन्नती साधणे होय. तर सीमित अर्थाने शिक्षण म्हणजे गुरुगृही जावून जीवनपयोगी शिक्षणाचे धडे गिरविणे होय. थोडक्यात वेदकालीन शिक्षण हे पुस्तकी शिक्षण नव्हते. वैदिककालिन शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनात सुखशांती निर्माण होण्यास मदत होणे, समाजजीवनातील अडीअडचणीवर मात करण्याची क्षमता निर्माण होणे व ऐहिक जीवनाचे वास्तविक सत्य जाणून जीवनाचे अंतिम सत्य प्राप्तीसाठी मदत होणे वगैरेसारख्या प्राथमिक व मुलभूत आणि दुय्यम गरजांची पूर्तता होण्यासाठी मदत व्हायची. म्हणूनच वैदिक काळातील शिक्षणाला 'प्रकाशस्त्रोत', 'अंतदृष्टी', 'ज्ञानचक्षू', 'माणसाचा तिसरा डोळा', 'कामधेनू किंवा कल्पवृक्ष' या उपाधीने गौरविले जाते. सांगायचे तात्पर्य हेच की, व्यक्तीच्या जीवनात सर्वार्थाने आमूलाग्र विधायक बदल घडवून व्यक्तीला आदर्श नागरीक बनविणे हा वैदिक शिक्षणाचा उदात्त हेतू होता.

पण आधुनिक काळात शिक्षणाचा उद्देश व अर्थ सर्वार्थानेच बदलल्याचे आढळते. शिक्षणाचा सद्य:कालीन अर्थ लक्षात घ्यावयाचे म्हटले तर काहीच्या मते, ''शिक्षण म्हणजे साक्षरता होय.'' काहीच्या मते, ''शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या अंगी जे पूर्णत्व अगोदरचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण होय.'' सांगायचे तात्पर्य हेच की, कालानुरुप शिक्षणाचा अर्थ हा वरवरचा, तात्पुरता, कृत्रिम व मर्यादित उद्दिष्टांपूरता होत गेल्याचे आढळते आहे.

वैदिक काळापासून ते बौद्धकाळापर्यंत गुरुकुल आणि आश्रम हीच शिक्षणाची केंद्रे होती. प्राचीन भारतात गुरुकुल शिक्षणपद्धत होती, पण कालांतराने एक प्रमुख गुरु किंवा आचार्य यांना सहकार्य करण्यासाठी अन्य काही गुरु किंवा आचार्य एकत्रित येवू लागले आणि त्यातूनच आश्रम व्यवस्थेची सुरुवात होवू लागली. प्राचीन काळाच्या या



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad